दैनिक

# अदिती एक्सप्रेस

- दि. २५ जानेवारी २०२६
- रविवार
- वर्ष ४ थे
- अंक ८६
- किंमत २ रूपये
- पृष्ठे ४
- लातूर
- RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे   उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in

### आजचे पंचांग

- दिनांक : २५ जानेवारी २०२६
- वार : रविवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : शुक्ल पक्ष
- तिथी : सप्तमी तिथी (रात्री ११:१० पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी
- नक्षत्र : रेवती नक्षत्र (दुपारी ०१:३५ पर्यंत) त्यानंतर अश्विनी न क्षत्र
- योग : सिद्ध योग (सकाळी ११:४५ पर्यंत) त्यानंतर साध्य योग
- करण : गराजा करण (सकाळी ११:५७ पर्यंत) त्यानंतर वाणीजा करण
- चंद्र राशी : मीन राशी (दुपारी ०१:३५ पर्यंत) त्यानंतर मेष राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : संध्याकाळी ०५:०२ ते संध्याकाळी ०६:२६ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२९ ते दुपारी ०१:१३
- सूर्योदय : सकाळी ०७:१६
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:२६
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

## प्रजासत्ताक दिनाच्या एक दिवस आधी मोठा आरडीएक्सने थेट रेल्वे रुळच उडवले

फतेहगड - भारताच्या प्रजासत्ता दिनाच्या एक दिवस आधी मोठी बातमी समोर येत आहे. पंजाबमधील फतेहगड साहिब जिल्ह्यातील सरहिंद परिसरात शुक्रवारी (२३ जानेवारी २०२६) मध्यरात्री एक मोठा स्फोट झाला. ही घटना रेल्वे मार्गावर घडली. जिथे एका मालगाडीला शक्तिशाली स्फोटक आरडीएक्सने लक्ष्य करण्यात आले. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की त्यामुळे रेल्वे ट्रॅकचे तुकडे झाले. सूत्रांचे म्हणणे आहे की, आरडीएक्सने ट्रेन उडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्फोटात मालगाडीचे इंजिन गंभीरपणे खराब झाले आणि चालक गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली. रेल्वे अधिकारी आणि पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू केला. सुरुवातीच्या अहवालात हा दहशतवादी हल्ला असल्याचे सांगितले जात आहे, परंतु अधिकृत पुष्टी अद्याप बाकी आहे.



ही घटना रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडली. सरहिंदमधील खानपूर गेटजवळ नव्याने बांधलेल्या रेल्वे मार्गावरून एक मालगाडी जात होती. ही लाईन विशेषत: मालवाहतुकीसाठी बांधण्यात आली होती, जी राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची आहे. इंजिन गेटजवळ येताच एक मोठा स्फोट झाला. स्फोट इतका शक्तिशाली होता की त्यामुळे ३-४ फूट ट्रॅक पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. मालवाहू ट्रेन जात असताना हा स्फोट झाला.

स्फोटामुळे मालवाहू ट्रेन रुळावरून घसरली

प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे की, मालवाहू ट्रेनच्या इंजिनचा पुढचा भाग उडाला आणि मालवाहू ट्रेन रुळावरून घसरली. आजूबाजूला सर्वत्र कचरा पसरला. यामुळे सर्वत्र घबराट पसरली. स्फोटात चालकाच्या डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाली. त्याला ताबडतोब स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले, जिथे त्याची प्रकृती स्थिर असल्याचे वृत्त आहे.

(पान २ वर)

## युनेस्को दर्जाप्राप्त गडकिल्ल्यांची स्वच्छता आणि संवर्धन मोहीम

मुंबई : युनेस्कोचा जागतिक वारसास्थळाचा दर्जा प्राप्त झालेल्या महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची स्वच्छता आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) विशेष स्वच्छता मोहीम हाती घेणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनानुसार ही मोहीम लवकरच राबवली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली.

युनेस्कोने महाराष्ट्रातील रायगड, प्रतापगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, राजगड, पन्हाळा, साल्हेर, लोहगड, सुवर्णदुर्ग, शिवनेरी आणि खंदेरी या ११ किल्लयांना ऐतिहासिक वारसास्थळाचा दर्जा दिला आहे. हा दर्जा कायम राखण्यासाठी स्वच्छता व पर्यावरण संवर्धन अत्यंत आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन ही विशेष मोहीम आखण्यात आली आहे.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गडकिल्ला स्वच्छता व संवर्धन मोहीम' राबवण्यात येणार असून, या मोहिमेचे ब्रीदवाक्य 'मानाचा मुजरा, हटवूया कचरा' असे असणार आहे. गडकिल्लूयांच्या परिसरात कार्यरत सामाजिक संस्था व स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जाणार आहे.

पर्यटकांच्यावाढत्यासंख्येमुळे निर्माण होणारा प्लास्टिक कचरा गोळा करून त्याचे पुनर्चक्रण, मासिक स्वच्छता मोहिमा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच वृक्षारोपण असे विविध उपक्रम या मोहिमेत राबवले जाणार आहेत.

या उपक्रमाचा शुभारंभ लवकरच किल्ले रायगड येथे होणार असून, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार असल्याची माहिती एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी दिली. दरम्यान, ११ ही गडकिल्लूयांची स्वच्छता राखून त्यांचा ऐतिहासिक दर्जा जतन (पान २ वर)

## भाजपच्या खारेपाटण जि. प. उमेदवार प्राची इस्वालकर बिनविरोध

कणकवली : तालुक्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपाकडून ठाकरे सेनेला सलग धक्के दिले जात आहेत. सलग दुसऱ्या दिवशी खारेपाटण जिल्हा परिषद मतदार संघातील ठाकरे सेनेच्या उमेदवार मीनल तळगावकर यांनी जिल्हा परिषद सदस्य पदाच्या निवडणूक रिंगणातून माघार घेतली. त्यामुळे या मतदार संघातील भाजपाच्या उमेदवार प्राची इस्वलकर या बिनविरोध निवडून आल्या आहेत.



या घडामोडींमुळे कणकवली तालुक्यात भाजपाकडून बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांची संख्या ३ झाली असून, कणकवली विधानसभा मतदारसंघात ही संख्या एकूण ४ पोहोचली आहे.

पालकमंत्री . नितेश राणे यांचे 'दे धक्का तंत्र' सध्या केवळ मतदार संघातच नव्हे, तर राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. मीनल तळगावकर यांच्या माघारीच्या निर्णयामुळे ठाकरे सेनेला हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

विशेष म्हणजे शनिवार असूनही निवडणूक प्रक्रियेमुळे (पान २ वर)

## सरकारने आठव्या वेतन आयोगासाठी उद्या बोलावली तातडीची बैठक

मुंबई : प्रतिनिधी: एकीकडे आठव्या वेतन आयोगाची चर्चा जोरात असताना वेतन आयोगाच्या अहवालातील शिफारशी आयोग अध्यक्षा रंजना देसाई यांना सुपूर्द करण्यात आल्या होत्या. लवकरच सरकार यावर अंतिम निर्णय घेणार आहे. दरम्यान उपलब्ध माहितीनुसार, सरकार अंतिम चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या व निवृत्तीधारक कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळ प्रतिनिधींशी बैठक उद्या २५ जानेवारी रोजी घेणार आहे.



कर्मचाऱ्यांच्या मागण्या व सूचनांची दखल घेण्यासाठी ही बैठक होणार असल्याचे समजते. प्रसारमाध्यमांनी दिलेल्या बातमीनुसार, रेल्वे, संरक्षण, टपाल, आयकर आणि इतर केंद्र सरकारी सेवांमधील कर्मचारी आणि पेन्शनर संघटनांसह अनेक प्रमुख विभागांच्या प्रतिनिधींना बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. नॅशनल काऊन्सिल (कर्मचारी) व संयुक्त सल्लागार मशिनरी (Joint Consultative Machinery NC JCM) यांच्या संयुक्त बैठकीतून सरकार वेतन आयोगात संबंधित ठोस निर्णय (पान २ वर)

## एमपीएड, एमएड सीईटीच्या प्रवेश नोंदणीला १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

मुंबई : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी कक्ष) घेण्यात येणाऱ्या मास्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (एमपीएड) व मास्टर ऑफ एज्युकेशन (एमएड) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

यानुसार विद्यार्थ्यांना १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज भरता येतील. एमपीएड अभ्यासक्रमासाठी आतापर्यंत १ हजार ३८, तर एमएड अभ्यासक्रमास १ हजार २३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. एमपीएड अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २४ मार्च रोजी होणार असून फिल्ड परीक्षा २५ मार्च रोजी होणार आहे. तसेच एमएड अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २५ मार्च रोजी आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांसाठीची सीईटी राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने घेणार आहेत.

उमेदवारांनी तपशीलवार वेळापत्रक आणि परीक्षेशी संबंधित सूचनांसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

## श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त आज बैठक

लातूर/प्रतिनिधी : लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधत यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून यात्रा महोत्सव सुरु होणार असून या महोत्सवाच्या पूर्व तयारीसाठी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असेआवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी केले आहे.



महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून या महोत्सवाचे आयोजन होत असून याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून ७३ वा यात्रा महोत्सव सुरु होणार आहे. या यात्रा महोत्सवात लातूर जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील व कर्नाटक राज्यातील नागरिक व भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. हा यात्रा महोत्सव शांततेत पार पडावा यासाठी प्रतिवर्षी विविध समित्या गठीत करण्यात येतात. सदर यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान येथे बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, शहरातील प्रतिष्ठीत नागरिक व शहर परिसरातील शिवभक्तांनी मोठ्या (पान २ वर)

## मौत का उड्डाणपूल प्रशासन दखल का घेत नाही!

लातूर : एक वेळ अशी होती कि लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील 'उड्डाणपूल' पर्यटन स्थळाप्रमाणे लोक पाहायला येत असत, पण अशात हा उड्डाणपुल 'मौत का उड्डाणपुल' म्हणून ओळखला जात आहे. अशा दुर्घटना वारंवार घडत असताना प्रशासन मात्र हा सर्व प्रकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. लातूरकरांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

काल दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ६१ वर्षाचा एक ईसम छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उड्डाण पुलावरून पडून मरण पावला. त्याचे प्रेत अद्यापही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या शवगृहात असताना काल २३ रोजी रात्री अकरा-साडेअकराच्या सुमारास याच उड्डाणपुलावरून जाणारा एक तरूण पुलाच्वय कठड्यास धडकला, त्याची मोटारसायकल पुलावरच राहिली पण तो पुलाच्या पश्चीम बाजूस खाली कोसळून ठार झाला. यापुर्वी काही जणांनी पुलावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. उड्डाण पुलावरून एकदा चारचाकी वाहन व बुलेट खाली कोसळले होते.

(पान २ वर)

## निळकंठेश्वर साखर कारखान्याची ऐतिहासिक कामगिरी

### दीड लाख मेट्रिक टन गाळप पूर्ण, शेतकऱ्यांना मोठा दिलासा

दै. अदिती एक्सप्रेस

औसा- श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याने चालू गाळप हंगामात दीड लाख १,५०,०००मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण करून विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. काटेकोर नियोजन, आधुनिक यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर आणि शेतकरी व कारखाना प्रशासन यांच्यातील उत्तम समन्वय यामुळे हे उद्दिष्ट वेळेत साध्य झाले असून संपूर्ण परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या कारखान्यात दररोज सरासरी २८०० ते २९०० मेट्रिक टन प्रति दिन इतक्या क्षमतेने अखंड गाळप सुरू आहे. विशेष म्हणजे यंदा साखर उताराही समाधानकारक आणि चांगला मिळत असल्याने कारखान्याच्या आर्थिक स्थितीला भक्कम आधार मिळाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली कामगार, अधिकारी आणि संचालक मंडळ यांनी एकसंघपणे केलेल्या प्रयत्नांचे हे यश असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.कारखाना प्रशासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देत स्पष्ट केले आहे की, ज्या शेतकऱ्यांचा ऊस अद्याप शिल्लक आहे त्यांनी कोणतीही चिंता करू नये. शेवटच्या शेतकऱ्याचा ऊस गाळप होईपर्यंत कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यात येणार आहे. (पान २ वर)

## ग्रामीण भागात काँग्रेसने विकासाचं मॉडेल उभे केले

### माजी आमदार धिरज देशमुख यांची सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका




दै. अदिती एक्सप्रेस

लातूर दि. २४. ग्रामीण भागाच्या विकासासाठी काँग्रेसने कायम ठोस आणि दीर्घकालीन मॉडेल तयार केलं असून, भाजपकडून मात्र प्रतीकात्मक उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिकांची दिशाभूल केली जात असल्याचे प्रतिपादन काँग्रेस नेते तथा लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने एकूर्गा जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाला. मांजरेश्वर देवस्थान येथे प्रचाराचा नारळ वाढवून शुभारंभ केल्या नंतर मुरूड अकोला,अंकोली येथे आयोजित कॉर्नर सभेत ते बोलत होते.

सत्ताधाऱ्यांकडून खोटी आश्वासने, दिखाऊ मॉडेल

यावेळी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, काँग्रेसच्या काळात ग्रामीण भागात रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि कृषी क्षेत्रात मूलभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या. ग्रामीण विकास म्हणजे केवळ दिखाऊ उपक्रम नव्हे, तर लोकांच्या दैनंदिन जीवनात बदल घडवणारी कामं असायला हवीत, मात्र

भाजप सरकार आणि भाजपाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी खोटी आश्वासन , आणि दडपशाहीचे मॉडेल उभे केलं आहे , महत्वकांक्षी असणारा मराठवाड्यातील रेल्वे बोगी कारखाना सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिकांच्या भावनांना हात घालण्याचा प्रयत्न देखील भाजप कडून केला जात आहे, मात्र यामुळे ग्रामीण भागातील रोजगाराच्या मूळ प्रश्नांचं (पान २ वर)

## आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या भेटी घेत साधला संवाद

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर प्रतिनिधी- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि.२४ जानेवारी रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्थाचे पदाधिकारी, काँग्रेस पक्ष पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेत त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेत त्यांच्याशी संवाद देखील साधला. तसेच त्यांची निवेदने,निमंत्रनाचा स्वीकार करीत संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.



यासोबतच जिल्हा परिषद व पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकच्या अनुषंगाने

काँग्रेस व मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष- संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन ऍड.समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख,लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष- श्रीशैल उटगे,चंद्रकांत मद्दे,चाकुर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष-धनंजय कोरे, दिलीप माने, योगेश स्वामी,रामदास चव्हाण,महेबूब कारभारी,लता लोभे, निलेश देशमुख,विकास लोभे,ऋषिकेश यमगर, विद्याधर मादळे, (पान २ वर)

# हे किळसवाणे कोठून येते?

विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. बेकायदेशीर शाळेच्या महिला सहाय्यक नसलेल्या व्हॅनमध्ये एका चिमुकलीचा विनयभंग झाला. साधारण दीड वर्षांत घडलेल्या दुसऱ्या विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. या प्रकराची माहिती बातम्यांमध्ये काल आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता पसरली. बदलापूरमध्ये साधारण वर्ष – सव्वा वर्षापूर्वी शाळकरी मुलीच्या विनयभंगाचा दुर्दैवी प्रकार घडला होता. शाळेतल्या शिपायाकडूनच विनयभंगाचा प्रकार झाल्याने आणि शाळा प्रतिष्ठित, ख्यातनाम असल्याने पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास हयगय चालवली, तेव्हां बदलापूरकरांनी मोठ्या संख्येने रेल्वे रुळावर उतरून आपल्या भावनांना वाट करून दिली होती. त्या उद्रेकाने सगळ्या यंत्रणा वठणीवर आल्या होत्या. त्या विनयभंग प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेनंतर पोलिसांच्या गाडीत झालेल्या चकमकीत मारला गेला. त्या संपूर्ण प्रकरणाची आठवण महाराष्ट्राला काल पुन्हा एकदा झाली. गेल्या प्रकरणात शाळकरी मुलगी होती. यावेळी पूर्वप्राथमिक शाळेत, म्हणजे बालवाडीत जाणारी अवघी चार वर्षांची चिमुकली आहे. गेल्यावेळी शाळेतला शिपाई होता; यावेळी मुलांची शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी व्हॅनचा चालक आहे. म्हणजे, ज्यांची व्यवस्था मुलांच्या सहाय्यासाठी आणि संरक्षणासाठी केली आहे, तेच दोन्ही प्रकरणात आरोपी आहेत! अशावेळी विश्वास कोणावर ठेवायचा, असा प्रश्न हतबल पालकांसमोर उभा ठाकल्याशिवाय राहात नाही. दोन्ही घटना बदलापुरात घडल्याने हा प्रश्न केवळ बदलापूरपुरता सीमित आहे, असा गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. याची व्याप्ती पूर्ण देशभर आहे. महाराष्ट्राने; निदान महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांनी आणि पोलीस महासंचालकांनी तरी याची गंभीर दखल घेतली पाहिजे. अशा घटना घडू नयेत यासाठी कडक प्रतिबंधात्मक व्यवस्था केली पाहिजे. महाराष्ट्रातल्या महानगरी, शहरी, निमशहरी, ग्रामीण- अशा सर्व ठिकाणी समान पद्धतीने लागू करता येईल, अशीच ही उपाययोजना असायला हवी. बदलापूरला आता महिला नगराध्यक्ष असल्याने त्यांनी स्थानिक पातळीवर या प्रश्नाच्या खोलात जाऊन संबंधित यंत्रणांना उपाययोजनांसाठी मदतही केली पाहिजे. कारण, या शहराची इभ्रत राखण्याची सगळ्यात पहिली जबाबदारी त्यांची आहे!

बदलापुरात अगदी कमी अंतराने दोन घटना घडल्या आणि पहिल्या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला गहाळपणा केला, अन्यथा बदलापूरचं नांव एवढं चर्चेत येण्याचं काही कारण नव्हतं. अशाच घटना यापूर्वी मुंबईत, उच्चभ्रूंच्या मानल्या जाणाऱ्या शाळेतही घडल्या आहेत. त्या प्रकारानंतर शाळेच्या बस आणि शाळेने नेमलेल्या खासगी कंत्राटदारांच्या बस याबाबत बरीच चर्चा झाली होती. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या अशा बसमध्ये एक महिला सहाय्यक असावी, मुलांना बसमध्ये घेण्याची आणि शाळा सुटल्यानंतर त्यांना बसमधून पुन्हा पालकांच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी या महिला सहाय्यकावर सोपवावी, असा तोडगा निघाला होता. त्याची अंमलबजावणीही झाली होती. मुंबईत घडलेल्या त्या घटनेचे पडसाद इतके तीव्र होते, की बसच काय; मुलांची शाळेसाठी वाहतूक करणाऱ्या व्हॅनमध्येही महिला सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली होती. पण, नंतर आपल्याकडे जे घडतं, तेच झालं. काळ लोटला. प्रकरणाचं गांभीर्य कमी झालं. नवं शालेय वर्ष सुरू झालं. व्हॅनमधल्या महिला सहाय्यक गायब झाल्या आणि परवाचा प्रकार घडला! या बालिकांच्याबाबतच नाही, जगात कुठेही महिलांच्या विनयभंगाचे प्रकार घडले, अत्याचाराच्या घटना घडल्या, तर त्यातल्या बहुतांश घटनांमध्ये पुरुष नातेवाईक किंवा परिचितांपैकीच कोणीतरी आरोपी असतात, अशी सिद्ध झालेली आकडेवारी आहे. बदलापूरच्या पूर्वीच्या घटनेतला आरोपी शाळेचा शिपाई होता. परवा घडलेल्या आणि मुंबईतल्याही अलीकडच्या घटनेतले आरोपी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी असलेल्या गाड्यांचे चालक होते. परवाच्या घटनेच्या तपशिलात पाहिलं, तर व्हॅन नेहमी बालिकेला घेऊन ज्या वेळेला येते, त्यापेक्षा बराच उशीर झाल्याने पालकांनी चौकशी केली, तेव्हा त्यानंतर पाऊण तासाने व्हॅन पोहोचली. परतलेल्या बालिकेचं वर्तन पालकांना खटकल्याने त्यांनी जेव्हा खोदून खोदून चौकशी केली, तेव्हा आक्षेपार्ह प्रकार उघडकीस आला. चालकाला शाळेत बोलावलं, तेव्हा बालिका घाबरून पालकांमागे लपली. झाल्या प्रकाराला त्यातून दुजोरा मिळाला, असं समजतं. हा संपूर्ण प्रकारच अत्यंत किळसवाणा आहे.

इतक्या छोट्या मुलींचा विनयभंग होईल, असं दुष्कृत्य करावंसं संबंधित पुरुषांना का वाटत असेल? त्यांच्या मनात असं अभद्र कशातून उगवत असेल? शिक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ या प्रकारांसाठी पहिले दोषी ठरवतात, ते मोबाईलमधून २४ तास स्त्रवत असलेल्या हिंसक, लैंगिक, भावना उद्दीपित करणाऱ्या 'मनोरंजना'च्या तथाकथित कार्यक्रमांना. या कार्यक्रमांतून; छोट्या छोट्या रीलमधूनही जे पोहोचतं, त्यातून अशा आक्षेपार्ह बाबींबाबतचं गांभीर्य, धाक संपून जातो. नैतिकतेचे सारे संस्कार गळून पडतात. असा एखादा कार्यक्रम किंवा रील पाहिल्या, तरी तुमच्या मोबाईलवर त्याच प्रकारचे कार्यक्रम, रील किंवा मनोरंजनाच्या तत्सम प्रकारांची रांग लागते. पाहणारा एकामागून एकात गुंतत जातो. त्यातून सगळं जग अशा विकृत प्रकारांनीच भरलं असल्याचा भास त्याला होतो. जे 'खासकरून' बनवलेलं असतं, तेच त्याला 'सर्वसाधारण' वाटू लागतं. त्यातून हे प्रकार वाढीस लागतात. साहजिकच प्रौढांपेक्षा तरुणांमध्ये, कुटुंबापासून लांब असलेल्या किंवा निवासाच्या अपुऱ्या सोयी असलेल्यांमध्ये हे प्रकार अधिक आहेत. बदलापूरमध्ये घडलेल्या दुर्घटना उघडकीस आल्या, त्याची दखल पालकांनी घेतली, प्रकरण पोलिसांपर्यंत नेण्याचा आग्रह धरला म्हणून; अन्यथा मुंबई आणि मुंबईलगत पसरलेल्या अक्राळविक्राळ वस्त्यांचा नुसता अंदाज घेतला, तरी त्यात असे असंख्य प्रकार आढळतील. अगदी लहान मुलांमध्ये (केवळ मुलींनानव्हे!), शाळेच्या शिक्षकवृंदासह सर्व कर्मचाऱ्यांमध्ये, सहाय्यक ज्या स्तरातून येतात, त्या स्तरांमध्ये आणि महत्त्वाचं म्हणजे, पोलिसांमध्ये मुली-महिलांवरील अशा विनयभंग, जोर-जबरदस्तीच्या प्रकरणांबाबतची संवेदनशीलता वाढवली पाहिजे. अशी संवेदनशीलता वाढवणं, ही जागृतीनंतरची पुढची पायरी आहे. समाजमाध्यमांतून वाहत असलेल्या, अतिरंजित, विकृत 'मनोरंजना'चं काय करायचं, हा जगातल्या सगळ्याच सरकार आणि समाजधुरिणांसमोरचा प्रश्न आहे. हा 'जागतिक प्रश्न' जेवढ्या लवकर सुटेल, तेवढे पुनःपुन्हा 'बदलापूर' होण्यापासून वाचेल!

# राष्ट्रीय मतदार दिन

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करून भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## पान १ वरून

### प्रजासत्ताक दिनाच्या...

डॉक्टरांचे म्हणणे आहे की वेळेवर उपचार केल्याने त्याचा जीव वाचला. २६ जानेवारीपूर्वी दहशतवादी कट उघडकीस आला आहे.

ही रेल्वे लाईन चाचणीसाठी सुरू

रेल्वे सूत्रांनुसार, ही नवीन लाईन सध्या चाचणीसाठी सुरू आहे. मालवाहू ट्रेनमध्ये कोणताही मोठा माल वाहून नेण्यात आला नव्हता, परंतु स्फोटामुळे मोठा अपघात टळला. जर ती प्रवासी ट्रेन असती तर मोठी जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान होऊ शकले असते. स्फोटामुळे परिसरात गोंधळ उडाला. स्थानिकांनी मदत करण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराला वेढा घातला आणि फॉरेन्सिक टीमला बोलावले. आरडीएक्स, एक उच्च-स्फोटक सामग्री, वापरल्याचा संशय आहे. ते कसे पेरले गेले आणि कोणी पेरले हा तपासाचा विषय आहे. पंजाब पोलिसांचा असा विश्वास आहे की हे एक सुनियोजित कट असल्याचे दिसते. दहशतवादी संघटनांची भूमिका तपासली जात आहे.

काँग्रेसने काय म्हटले?

रेल्वे ट्रॅक स्फोटांवर पंजाब काँग्रेस नेते अमरिंदर सिंग राजा वाडिंग यांची एक पोस्ट देखील समोर आली. अमरिंदर सिंग राजा यांनी लिहिले, रेल्वे ट्रॅकजवळ आरडीएक्स, सार्वजनिक ठिकाणी स्फोट हे सामान्य गुन्हे नाहीत. हे पंजाबला अस्थिर करण्याचा आणि भीती पसरवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आहेत.

### युनेस्को...

करण्यासोबतच परिसरातील पर्यावरण संवर्धनालाही चालना दिली जाईल, असा विश्वास मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंह यांनी व्यक्त केला आहे.

### भाजपच्या खारेपाटण...

निवडणूक कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. दुपारी ३ वाजेपर्यंत आणखी कोण उमेदवार माघार घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. कालच या मतदार संघातील अपक्ष उमेदवार उज्ज्वला चिके यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला होता. त्यानंतर आज ठाकरे शिवसेनेच्या एकमेव विरोधी उमेदवार मीनल तळगावकर यांनीही माघार घेतल्याने प्राची इस्वलकर या या मतदार संघातील एकमेव उमेदवार राहिल्या. दरम्यान, 'दे धक्का' तंत्राचा मोठा फटका २७ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी आणखी बसण्याची शक्यता आहे.

### सरकारने आठव्या....

घेण्यासाठी विचार विनिमय करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता १३-सी, फिरोजशाह रोड, नवी दिल्ली येथे होणार आहे.

एनसी-जेसीएमचे सचिव शिव गोपाल मिश्रा यांनी मसुदा समितीच्या सदस्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, वेतन आयोगाचे कार्यालय पूर्णपणे कार्यान्वित झाल्यावर, परिषदेला सेवा-संबंधित मुद्द्यांवर आपले निवेदन सादर करण्यास सांगितले जाण्याची शक्यता आहे. तसेच विविध मुद्द्यांवरील प्रस्तावांना अंतिम रूप देण्यासाठी सविस्तर चर्चा अपेक्षित असल्याने, सदस्यांना सुमारे एक आठवडा दिल्लीत थांबावे लागू शकते असेही पत्रात त्यांनी नमूद केले आहे.

### श्री सिध्देश्वर...

संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मौत का...

काल शुक्रवार रोजी सकाळी उड्डाण पुलावरून पडून झालेल्या दुर्घटनेत मयत झालेल्या इसमाची ओळख अद्याप पटली नाही. तर रात्री साडेअकराच्या सुमारास तहसीलच्या बाजुने औसा रोडकडे निघालेल्या कासले, ता. शिरूर अनंतपाळ या तरूणाची मोटारसायकल उड्डाण पुलाच्या पश्चीम बाजूच्या कठड्यास धडकली, त्याची मोटारसायकल पुलावरच राहिली तो मात्र काही फूट खोल रस्त्यावर कोसळून मरण पावला. शहरात अशा वारंवार घटना घडत असताना वाहनाचा वेग कमी करण्यासाठी, कठड्याला जाळी बसविणे, उड्डाणपुलावर पर्यटनाप्रमाणे रेंगाळणारे तरूण याच्या प्रतिबंधासाठी उपाय योजले जात नाहीत. उड्डाण पुलाचे कठड्यास लोखंडी जाळी, खाली नॉयलनची जाळी सारख्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे. पण उपाययोजना कोण करायच्या या वादात अशा दुर्घटना पाहत राहणे एवढेच लातूरकरांच्या हातात आहे.

### निळकंठेश्वर...

या आश्वासनामुळे शेतकऱ्यांमध्ये विश्वास आणि समाधानाची भावना अधिक बळावली आहे. निळकंठेश्वर साखर कारखाना हा परिसरातील शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने आधारस्तंभ ठरत आहे. वेळेवर गाळप, चांगला उतारा आणि शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी धोरणे यामुळे कारखान्याने आपली विश्वासार्हता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. आगामी काळातही शेतकरी, कामगार आणि व्यवस्थापन यांच्या सहकार्याने आणखी मोठी उद्दिष्टे गाठली जातील, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

### ग्रामीण भागात...

निराकरण होत नाही. लोकांना खोटी आश्वासन आणि कोपराला गुळ लावण्यापेक्षा त्यांच्या गरजा पूर्ण करणं महत्त्वाचं आहे,

काँग्रेस पक्ष भविष्यातही शेतकरी, युवक, महिला , कष्टकरी आणि ग्रामीण जनतेच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध राहील, असा विश्वास धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला. एकुर्गा जिल्हा परिषद गटातील कोंग्रेस आघाडीचे उमेदवार दत्तात्रय टेकाळे, पंचायत समिती गणात पूजा ढगे, गुरुनाथ गवळी, यांच्या पाठीमागे मतांची ताकद उभी करण्याचे आवाहन त्यांनी मतदारांना केले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ. अमित....

व्यंकटेश पुरी, प्रभाकर बंडगर, डॉ. बालाजी साळुंखे,संजय खाडे,मनोज देशमुख,अरफ़ात खान,सलीम इनामदार,स्वयंप्रभा पाटील, मोहन सुरवसे, मुरलीधर निकम,राम मिटकरी,राजू किसवे, श्रीधर पाटील,युसुफ शेख,जावेद शेख,सिकंदर पटेल,गणपत महाराज माकणे,अतुल नायक, विजय पतंगे आदिसह राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी,कार्यकर्ते,महिला भगिनी,नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी बाभळगाव निवासस्थानी भाजपा युवा मोर्चाचे चाकूर तालुकाध्यक्ष- दिलीप येणगे व वंचित बहुजन आघाडी चाकुरचे माजी तालुकाध्यक्ष- रामेश्वर हाके यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. सर्वांचे आमदार अमित देशमुख यांनी काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना पुढील पक्ष कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



# संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त : डॉ. आनंद रेड्डी

लातूर, - आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून तणाव, चिंता व नैराश्य यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत संतुलित जीवनशैली अंगीकारणे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ तथा व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षक डॉ. आनंद रेड्डी यांनी केले.

एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागाच्या वतीने कृत्रिम दंत रोपण दिनानिमित्त आयोजित 'मानसिक आरोग्य व ताण व्यवस्थापन' या विषयावरील व्याख्यानात डॉ. आनंद रेड्डी बोलत होते. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. सुषेन गांजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. आनंद रेड्डी पुढे म्हणाले की, नियमित व्यायाम, योग व ध्यान यामुळे मन शांत राहते. दररोज किमान सात ते आठ तासांची पुरेशी झोप, संतुलित आहार, पाण्याचे योग्य सेवन, छंद जोपासणे, संगीत ऐकणे तसेच आवडत्या व्यक्तींसोबत वेळ घालवणे हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत. वेळेचे योग्य नियोजन, काम व वैयक्तिक आयुष्यात समतोल राखणे आणि सोशल मीडियापासून वेळोवेळी विश्रांती घेणे ही संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यास पोषक ठरते.

ताण, भीती किंवा दबावाच्या परिस्थितीत सहानुभूतीजन्य मज्जासंस्था सक्रिय होत असल्याने हृदयाचे ठोके वाढणे, श्वासोच्छ्वास वेगाने होणे व मन अस्थिर होणे यांसारख्या प्रतिक्रिया निर्माण होतात, असे त्यांनी स्पष्ट केले. याउलट परासहानुभूतीजन्य मज्जासंस्था मन शांत ठेवण्यास व शरीराला विश्रांती देण्यास मदत करते. दैनंदिन जीवनात योग्य सवयी, सजग श्वसन पद्धती आणि जीवनशैलीतील सकारात्मक बदलांव्दारे ही प्रणाली अधिक प्रभावीपणे सक्रिय करता येते, असे त्यांनी नमूद केले.

शरीर, श्वास व मन यांतील अतूट नातेसंबंध स्पष्ट करताना श्वासोच्छ्वासाच्या गतीत होणाऱ्या बदलांचा थेट परिणाम मनः स्थितीवर होतो. योग्य व सजग श्वसनामुळे मानसिक ताण कमी होतो, एकाग्रता वाढते तसेच निर्णयक्षमता सुधारते, हे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून अधोरेखित केले.

दंत वैद्यकीय शिक्षणातील वाढता अभ्यासाचा ताण, स्पर्धा तसेच भविष्यातील व्यावसायिक व कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेता अशा प्रकारच्या मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून संवादकौशल्य, भावनिक समतोल, वेळेचे योग्य नियोजन, संघभावना व सकारात्मक दृष्टिकोन यांसारख्या सामान्य कौशल्यांचा विकास होणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे डॉ. रेड्डी यांनी सांगीतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समर्थ रेवडकर, डॉ. वेदिका देशमुख, डॉ. श्रेयस मगर यांनी केले तर आभार डॉ. सुषेन गांजरे यांनी मानले. या कार्यक्रमास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विभाग प्रमुख डॉ. सिराज बादल, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. प्रविण मरुरे, डॉ. राघवेंद्र मेत्री, डॉ. अमोल बडगीरे, व डॉ. शितल वाघ, डॉ. बालाजी मुंडे, डॉ. योगेश नागरगोजे, डॉ. प्रणोती चिंचनसुरे, डॉ. शारदा झाडके, डॉ. प्रतिक्षा सोमवंशी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बी.डी.एस. व एम.डी. एस. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगलूर महाविद्यालयात फूड फेस्टिवल उत्साहात संपन्न

देगलूर(प्रतिनिधी): अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, नेतृत्वगुण आणि स्वावलंबनाची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने 'आनंद नगरी' फूड फेस्टिवलचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

या फेस्टिवलला विद्यार्थी, प्राध्यापक, पालक तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. दरम्यान सकाळी १०:०० वाजता देगलूर महाविद्यालयात आनंदनगरी महोत्सवाचे उद्घाटन सहाय्यक शिक्षण उपसंचालक संजय पंचगल्ले यांच्या हस्ते करण्यात आले. या आनंदनगरी महोत्सवात पस्तीस विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी स्टॉल लावले होते. यामध्ये तब्बल पासष्ट हजार रुपयाचे खाद्य पदार्थ विक्री केले. यामध्ये गुलाबजामून, मटकी भेळ, जिलेबी, पावभाजी, आलू बिर्याणी, व्हेज पुलाव, पाणीपुरी, पापड, पपडी चाट, समोसा, कचोरी, मुरमुरा भेळ, पोहे चिवडा, मटकी, पेस्ट्री, लाडू, गुळपागुळ, मेंदूवडा, दही वडा, इडली, म्हैसूर भजे, खिचडी, मुरमुरा चिवडा, चन्ना मसाला, ब्रूस सलाट, केळी, अननस, कप केक आदीं पदार्थ विक्रीस ठेवण्यात आले होते. या स्टॉलवर खरेदी करण्यासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची अक्षरशः झुंबड पडली 'आनंद नगरी' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः च्या कल्पकतेने स्टॉल्स सजवून ग्राहकांचे लक्ष वेधून घेतले.

या फूड फेस्टिवलचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची बीजे रोवणे, पाककलेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे, नेतृत्वगुणांचा विकास करणे तसेच आर्थिक व्यवहारांची जाणीव निर्माण करणे होता. स्टॉल व्यवस्थापन, कच्चा माल खरेदी, दर निश्चिती, ग्राहकांशी संवाद, नफा-तोट्याचे गणित यामधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी 'आनंद नगरी' उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, असे उपक्रम विद्यार्थ्यांना स्वरोजगाराकडे प्रवृत्त करणारे, आत्मविश्वास वाढवणारे आणि व्यावहारिक ज्ञान देणारे ठरतात. विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून मिळालेला अनुभव भविष्यात नक्कीच उपयोगी पडेल, असा विश्वास व्यक्त केला.

एकूणच 'आनंद नगरी' फूड फेस्टिवलमुळे स्नेहसंमेलनात आनंद, चव, शिक्षण आणि उद्योजकतेचा संगम पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला.या आनंद नगरी उपक्रम यशस्वी करन्यासाठी प्राचार्य डॉ मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, स्नेह सम्मेलन प्रभारी प्राध्यापक डॉ संजय पाटिल , कनिष्ठ महाविद्यालय उप प्राचार्य डॉ व्हि जी शेरीकर व डॉ पटेल एम एम व ऑफिस सुप्रीडेंट श्री गोविंद जोशी यांचे मार्गदर्शन लाभले आनंद नगरी संयोजक प्रा संतोष विजय येरावार व समिती सदस्य प्रा संतोष वानोळे , प्रा तुकाराम लागले , प्रा ऐनलावार निकिता , प्रा रेणुका धाडे , प्रा अश्विनी बोडके , प्रा सुषमा पाटिल , प्रा प्रियंका पाटिल , प्रा दीपाली बाऱ्हाळे प्रा पोर्णिमा चैनपुरकर , प्रा द्रुपता जाधव , प्रा जवेरिया फातेमा प्रा अनिल बोडके , प्रा सतीश कुलकर्णी , श्री प्रशांत चौहान , पांडुरंग जाधव व मारोती सोनकांबळे यांनी परिश्रम घेतले.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# 'स्व'चा बोध होणे हेच भारतीय शिक्षण :डॉ साठे



सोलापूर (प्रतिनिधी) – लहानपणी घेतलेले शिक्षण शेवटपर्यंत लक्षात राहते. ते राष्ट्राबद्दल अभिमान वाटावे असे मिळणे आवश्यक आहे. डिजिटायझेशन आवश्यक असून कौशल्य आधारित शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे स्वतः बोध होतो आणि हेच भारतीय शिक्षण असल्याचे प्रतिपादन पुणे येथील बृहन्महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्रा डॉ प्रशांत साठे यांनी दि.२३ जानेवारी रोजी केले.

सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक सुधारणा आणि महाराष्ट्रातील सद्यस्थिती या विषयावर बोलत होते. यावेळी सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा डॉ गौतम कांबळे, डॉ आनंद अँड लता लाभशेटवार ट्रस्ट, नागपूर आणि लाभशेटवार फाउंडेशनचे संस्थापक डॉ अनंत लाभशेटवार, डॉ लता लाभशेटवार, प्रा डॉ प्रभाकर कोळेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा डॉ साठे म्हणाले की, जगात कोणत्याही व्यक्तीमध्ये आदर्श काहीच नसते आणि कोणीच परिपूर्ण नसल्यामुळे सुधारण्यासाठी मोठा वाव असतो. तर सध्या जनमानसावर मीडियाचा प्रभाव मोठा आहे. त्यामध्ये प्रिंट मीडिया, सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडिया यांचा समावेश आहे. त्यामुळे स्क्रीनवरचा टाईम कमी करुन तो कृतीत उतरवावा असे आवाहन त्यांनी केले. तसेच भारतीय अर्थशास्त्र पैशाच्या किमतीपेक्षा मूल्य व वस्तूंचा संयमीत उपभोग घ्यायला शिकवीत असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे भारतीय शिक्षण हे प्रभावी असून वय वर्ष शून्य ते सहा या वयोगटासाठी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. शून्य ते तीन या वयोगटातील बालकावर घरातील संस्कार केले जातात. तर तिसऱ्या वर्षी ते अंगणवाडी व बालवाडीत जाते. त्यामुळे तीन ते सहा वर्षापर्यंत त्याला पाढे, उजळणी हे सर्व बारकावे शिकविल्यामुळे त्याची स्मरणशक्ती वाढते आणि हाच भारतीय शिक्षणाचा मुख्य पाया असल्याचे साठे यांनी सांगितले. तसेच आपली शिक्षण पद्धती ही अतिशय चांगली असून मातृ भाषेबरोबरच विविध प्रकारच्या भाषा शिकता येतात, तीच खरी भारताची विविधता असल्याचे त्यांनी नमूद केले. लहानपणीच शिकविलेले व घेतलेले शिक्षण हे स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले. तर स्वातंत्र्याकडे नेणारे शिक्षण असले पाहिजे. कारण आपण जे अनुभवत ते भारतीय शिक्षण असून सध्या सुरू असलेल्या सोशल माध्यमांचा वापर आवश्यकतेनुसार व गरजेपुरताच केला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. त्यामुळे २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात रचना हा मूळ पाढा व उजळणी असा समावेश केला असून संशोधन हे लायब्ररीयन, रेफरी, गाईड व विद्यार्थी यांच्या पुरते मर्यादित आहे. मात्र, ते तशा पद्धतीचे संशोधन न करता ते समाज उपयोगी होण्यासाठी त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे कुटुंबामध्ये प्रबोधन करणारे, पर्यावरण, समरसता निर्माण करण्याबरोबरच नागरी नियमांचे पालन करणारे शिक्षण आवश्यक असून त्याचाच या शैक्षणिक धोरणामध्ये समावेश केला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, आपली मूळ शिक्षण पद्धती भाषा, भूषा, भोजन, भजन, भ्रमण व भवन ही असून त्यावर या नवीन धोरणात भर दिल्यामुळे त्याचा येणाऱ्या पिढ्यांना फायदा निश्चितपणे होणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे मूळ संस्कार देणारे शिक्षण मिळावे अशी सद्यस्थिती यावी आणि ती येईल. कारण आपली नाळ भारतीय संस्कृतीशी जोडलेली आहे. तसेच राष्ट्रासाठी महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, डॉ बाबासाहेब आंबेडकर आदींसह महापुरुषांनी मोठे कार्य केली असल्याचे प्रा डॉ साठे यांनी सांगितले. तर अमेरिकेत प्राथमिक शिक्षणाची अवस्था अत्यंत दयनीय आहे. तेथील विद्यार्थ्यांना अर्थ व गणित या विषयाचे ज्ञान फारसे नाही. त्यातच त्यांचा वाचनाकडे देखील कल नसल्यामुळे तेथील प्राथमिक शिक्षणाची अवस्था अतिशय दयनीय असल्याचे डॉ अनंत लाभशेतवार यांनी सांगितले. तसेच शिक्षण हे माणसाला दृष्टा बनतो. तो कोणालाही भीत नाही आणि घाबरवत देखील नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच २०२० चे शैक्षणिक धोरण अत्यंत चांगले आहे. मात्र त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात ज्या पद्धतीने होत आहे. तशा पद्धतीने इतर राज्यात झाली नसल्याची खंत प्रा डॉ गौतम कांबळे यांनी व्यक्त केली. आपल्या देशाची रचना संघराज्य पद्धतीवर अवलंबून आहे. त्यामुळे केंद्राने स्वीकारलेले धोरण राज्य सरकार स्वीकारेल असे होत नाही, ही मोठी अडचण असून केंद्र सरकारने तसा निर्णय घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सर्वत्र लागू करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत असे आवाहन प्रा डॉ कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा डॉ प्रभाकर कोळेकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा तेजस्विनी कांबळे यांनी व उपस्थितांचे आभार प्रा ज्ञानेश्वरी हजारे यांनी मानले. या व्याख्यानास विद्यापीठातील सर्व विभागाचे प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेताजी हे स्वतंत्र संग्रामाचे महानायक - वचने



उमरगा (प्रतिनिधी) – नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रणी सेनापती म्हणून अत्यंत महत्त्वाची व निर्णय भूमिका बजावली. त्यामुळे आपला देश स्वतंत्र झाला. त्यांच्या धाडसी वृत्तीमुळे इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले होते. त्यामुळे त्यांची दखल घेऊन इंग्रजांची पळता भुई थोडी झाली होती असे प्रतिपादन व्यंकट वचने यांनी दि.२३ जानेवारी रोजी केले.

उमरगा येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्या मंदिरमध्ये महानायक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार या होत्या. यावेळी विवेक जाधव, नागनाथ तांबुळे, बेबी सरोजा पवार, महेश कुलकर्णी, अविनाश जोशी आदी उपस्थित होते .पुढे बोलताना वचने म्हणाले की, इंग्रजांच्या जुलमी राजवटीच्या विरुद्ध अत्यंत धाडसाचे काम नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केले. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आजाद हिंद सेनेची स्थापना करून, एक स्वतंत्र सैनिकाची तुकडी निर्माण करून त्यांनी आपल्या देशासाठी खूप मोठे कार्य केल्यामुळे इंग्रजांना आपला देश सोडून जाण्यास भाग पाडले. अशा महामानवाची जयंती साजरी करताना आजच्या विद्यार्थ्यांनी अशा व्यक्तिमत्त्वापासून बोध घेऊन आपल्या जीवन कार्यामध्ये त्यांचे आचरण करावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विवेक जाधव यांनी मानले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दानपेटीतील अंगठी प्रकरणी मंदिर संस्थानची भूमिका मांडली

धाराशिव (प्रतिनिधी) – दानपेटीमध्ये चुकून पडलेल्या मौल्यवान वस्तूंविषयी गेल्या दोन दिवसांपासून काही प्रसारमाध्यमांमध्ये वस्तुस्थिती न तपासता अपूर्ण व दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध होत असल्याच्या पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी अधिकृत खुलासा प्रसिद्ध केला आहे.

पुण्यातील भोसरी येथील भाविक सुरज कृष्णा टिंगरे हे दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४:१५ ते ४:३० या वेळेत श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले होते.दर्शनावेळी त्यांनी दानपेटी क्रमांक १२ मध्ये दान स्वरूपात काही रक्कम टाकत असताना त्यांच्या बोटातील सोन्याची अंगठी चुकून दानपेटीत पडल्याचा दावा केला आहे.सदर अंगठी परत मिळावी यासाठी त्यांनी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या कार्यालयाकडे लेखी विनंती अर्ज सादर केला होता.

या अर्जाच्या अनुषंगाने,दिनांक ३ ऑगस्ट २०१७ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी, धाराशिव तथा अध्यक्ष,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,तुळजापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील ठरावाचा संदर्भ मंदिर संस्थानने दिला आहे.या ठरावानुसार, श्री तुळजाभवानी देवींच्या दानपेटीत भाविकांकडून नजर चुकीने पडलेल्या मौल्यवान वस्तू या दान स्वरूपात समजण्यात येतील व त्या परत देण्यात येणार नाहीत,असा स्पष्ट निर्णय घेण्यात आलेला आहे.

या निर्णयानुसार,सुरज कृष्णा टिंगरे यांना मंदिर संस्थानच्या वतीने दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृत पत्राद्वारे सदर बाब कळविण्यात आली आहे.मात्र,या प्रकरणाबाबत काही प्रसारमाध्यमांनी वस्तुस्थिती न तपासता बातम्या प्रसिद्ध केल्याने भाविकांमध्ये गैरसमज निर्माण होत असल्याचे मंदिर संस्थानने नमूद केले आहे.

मंदिर संस्थानने स्पष्ट केले आहे की, यापूर्वी अशा प्रकारच्या घटनांचा गैरफायदा घेण्याचे प्रकार समोर आलेले आहेत. काही अपप्रवृत्तीचे लोक चुकून दानपेटीत मौल्यवान वस्तू पडलीअसा दावा करून दानपेटीतून मौल्यवान वस्तू मिळवण्याचा प्रयत्न करत होते. अशा प्रकारची फसवणूक रोखण्यासाठी तसेच दानपेटीतील पारदर्शकता व सुरक्षितता राखण्यासाठीच हा नियम करण्यात आलेला आहे. हे विशेषत्वाने नमूद करण्यात आले आहे की,असा नियम करणारे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान हे एकमेव संस्थान नाही,तर देशातील अनेक देवस्थानांनीदेखील याच धर्तीवर असे नियम अमलात आणलेले आहेत.

तरी,प्रसारमाध्यमानी वस्तुनिष्ठता, अधिकृत कागदपत्रे व मंदिर संस्थानची भूमिका समजून घेऊनच बातम्या प्रसिद्ध कराव्यात, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच, भाविक भक्तांनी दानपेटीमध्ये दान करताना दागिने व मौल्यवान वस्तूंबाबत विशेष दक्षता घ्यावी, असे नम्र आवाहनही श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी केले आहे.

# लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदारांचा सक्रिय सहभाग आवश्यक



धाराशिव,(प्रतिनिधी) – २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस. लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी व मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने सोळावा राष्ट्रीय मतदार दिवस जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दि.२३ जानेवारी रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी लोकशाहीची मूल्ये जपण्याची, संविधानाने दिलेल्या मतदानाच्या हक्काचा जबाबदारीने वापर करण्याची आणि निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची सामूहिक मतदार शपथ घेतली.

नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पुष्पहार अर्पण केला. उपस्थितांनी देखील अभिवादन करून पुष्प वाहिली. राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे नागरिकांमध्ये मतदार म्हणून असलेल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव निर्माण करणे हा आहे. मतदार नोंदणी करणे, मतदान करणे व स्वच्छ, पारदर्शक आणि निर्भय निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे हे लोकशाहीच्या सुदृढतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक मताचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे नमूद करण्यात आले. मतदान हे केवळ अधिकार नसून एक सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारी असल्याची जाणीव नागरिकांनी ठेवावी, असे आवाहन करण्यात आले.विशेषतः युवकांनी मतदार नोंदणी करून पहिल्यांदाच मतदान करताना उत्साहाने सहभागी व्हावे, असेही आवाहन करण्यात आले.

राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदारांमध्ये जागरूकता वाढविणे, मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि लोकशाही प्रक्रियेत सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.या उपक्रमामुळे मतदारांमध्ये सकारात्मक संदेश गेला असून लोकशाही अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी ढाकणे, नायब तहसिलदार सचिन पाटील, संतोष पाटील यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

धाराशिव (प्रतिनिधी) – २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाची अंमलबजावणी होऊन भारत एक प्रजासत्ताक देश बनला. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस देशभर प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा समारंभ जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते मुख्य ध्वजा रोहणाचा कार्यक्रम पोलीस मुख्यालय मैदान क्र.२ येथे दि.२६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता होणार आहे. सकाळी ९.३५ ते ९.५० या वेळेत पोलीस परेड व चित्ररथ संचलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.५० ते १०.१० या कालावधीत जिल्हास्तरावर व तालुकास्तरावरून सुमारे ३ हजार विद्यार्थ्यांचा देशभक्तीपर गीतांवर आधारित एकत्रित सामूहिक कवायत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सकाळी १०.१० ते १०.२५ या वेळेत सरनाईक हे स्वातंत्र्य सैनिकांना भेट देऊन त्यांना शुभेच्छा देणार आहेत.

# ३२ वर्षापासून एकनिष्ठ असलेल्या भाजपच्या यांना तिकीट नाकारले



धाराशिव (प्रतिनिधी) – १९९४ पासून भारतीय जनता पार्टीचा झेंडा खांद्यावर घेतलेल्या लिंबराज साळुंके यांना करजखेडा पंचायत समितीचे तिकीट मिळण्यासाठी पार्टीच्यावतीने ए फॉर्म देण्याऐवजी बी फॉर्म दिला आहे. एकनिष्ठ कार्यकर्ता असून त्यांना ए फॉर्म कशामुळे डावलण्याची कारण काय अशी चर्चा मतदार संघामध्ये जोरदारपणे रंगू लागली आहे.

धाराशिव तालुक्यातील करजखेडा पंचायत समिती गणातून भारतीय जनता पार्टीच्यावतीने लिंबराज साळुंके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पक्षाने देखील त्यांना बी फार्म दिला आहे. मात्र, अधिकृत उमेदवारी मिळण्यासाठी ए फॉर्म मिळणे आवश्यक आहे. साळुंके यांना उमेदवारी देण्याऐवजी ज्या व्यक्तीस भाजप उमेदवारी देणार आहे त्या व्यक्तीचे कुठल्याही स्वरूपाचे काम नाही किंवा कुठल्याही प्रकारचा मतदार संघामध्ये जनसंपर्क नाही. त्यामुळे जनतेत नाराजी वाढले असून साळुंके यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी होऊ लागली आहे. साळुंके यांनी १९९५ पासून भारतीय जनता पार्टीच्या शाखा उघडण्यासह कार्यकर्ते जोडणे व पक्षाचे कार्य सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्याचे काम केलेले आहे. त्याबरोबरच त्यांनी पंचक्रोशीतील नागरिकांना विविध महामंडळाच्या माध्यमातून १५ कोटी रुपयांची कर्ज प्रकरणे मंजूर करून त्याचे वाटप केले आहे. त्यामुळे अनेकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तर संजय गांधी, इंदिरा गांधी, श्रावणबाळ योजना आदी योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले योजनेच्या माध्यमातून दीड हजार विधवा महिलांच्या दीडशे मुलांना शासनाची मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याबरोबरच पंचक्रोशीत जलयुक्त शिवार, ओढा खोलीकरणाचं काम, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलवले आहे. तर पंचक्रोशीतील गावांमध्ये सिमेंट रस्ते व शिवारात बंधारे बांधले आहेत. तसेच गावोगावी मंदिराचा विकास करण्यासाठी पाठपुरावा केला आहे. त्यांचे कार्य प्रत्येक गावात असल्यामुळे त्यांचे व जनतेचे थेट संबंध आले असून त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. त्यांना उमेदवारी द्यावी अशी नागरिकांची मागणी असून पक्षाने जनभावण्याचा आदर करीत साळुंके यांच्या गळ्यात उमेदवाराची माल टाकल्यास ते निश्चितपणे विजयी सलामी देतील असा सूर नागरिकांतून निघू लागला आहे.

# ईव्हीएम हटाओ या मागणीसाठी बस स्थानकात दगडफेक

धाराशिव (प्रतिनिधी) ईव्हीएम मशीनवर होणाऱ्या मतदानामध्ये चोरी होत असल्याचा सर्वत्र आरोप केला जात आहे. त्यामुळे ईव्हीएम ऐवजी बॅलेटवर मतदान घ्यावे या मागणीसाठी कळंब तालुक्यातील तांदुळवाडी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र, त्या आंदोलनाची शासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. त्यामुळे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बस स्थानकात दगडफेक करून सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी बीड व नांदेड येथील तीन तरुणांना अटक केली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील माला विषयक गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दि.२२ जानेवारी रोजी रवाना होऊन पेट्रोलिंग करीत असताना धाराशिव बस स्थानकावर बसची तोडफोड झाल्याचे बाबत आनंदनगर पोलीस ठाणे गुरनं२५/२०२६ कलम बी.एन. ३२४ (५), ३(५) एस. अन्वये गुन्हा दाखल असुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने तांत्रीक विश्लेषनाद्वारे व गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, धाराशिव बस स्थानकात बस फोडणारे इरोपी व ती कार ही कळंब येथे असल्याची माहिती मिळल्याने पथकाने तात्काळ सदर ठिकाणी जाऊन साईनाथ गणेशराव सावंत (वय २५ वर्षे) रा. गणेशराव सावंत, गोर्था उमरी नांदेड, श्रावण उर्फ पंपु राजेंद्र शिंदे (वय २५ वर्षे), रा. तलवाडा ता. गेवराई जि. बीड, अमोल भिमराव भोंग (वय २५ वर्षे) रा. राहेगाव ता. जि. नांदेड, यांना ताब्यात घेवून विचार पुस केली असता नमूद आरोपींनी सांगीतले की, आमच्या संस्थेचे अध्यक्ष हे मागील काही दिवसांपासून कळंब तालुक्यातील तांदुळवाडी येथे आमरण उपोषणासाठी बसलेले आहेत.

त्याची दखल घेण्यात आली नसल्यामुळे आम्ही शासनाचे लक्ष वेधण्यासाठी धाराशिव येथील बस स्थानकात जाऊन बसला उपोषणाचे कागद चिटकाऊन नंतर उभे असलेल्या बसवर निषेधार्त म्हणून दगड मारुन नुकसान केले. तसेच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्या आरोपींनी सदर गुन्ह्यातील वापरलेली ओंरा होंडा कार क्र एमएच २५ ए.एस. ५१४२ एकुण ७ लाख ५० रुपये किंमतीची ताब्यात घेण्यात आली आहे. नमूद आरोपीस पुढील कार्यवाही कामी आनंदनगर पोलीस ठाण्यात नेले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि विनोद इज्जपवार यांच्या आदेशावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, पोलीस हवालदार अमोल निंबाळकर, अमोल चव्हाण, बळी शिंदे, मपोहेकॉ शोभा बांगर, चालक पोलीस अंमलदार दहीहंडे यांच्या पथकाने केली आहे.

# जवळा येथे त्यागमूर्ती माता रमाई जयंती कार्यकारणी गठित

## नियोजन बैठकीत कार्यक्रमातील विविध उपक्रमांचा आराखडा मंजूर

नांदेड प्रतिनिधी: नांदेड दक्षिण मतदार संघातील लोहा तालुक्यात येत असलेल्या जवळा दे येथील विश्वशांती बुद्ध विहार या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे त्याग मूर्ती माता रमाई जयंती महोत्सवाची कार्यकारणी गठीत करण्यात आली. व यावेळी सर्व उपासक-उपासिकांच्या उपस्थितीत सकाळी ध्वजारोहण त्यापूर्वी विविध स्पर्धा प्रमुख व्याख्यात्यांचे मार्गदर्शन दुपारी भव्य देखाव्यासह गावातील प्रमुख मार्गाने मिरवणूक आणि त्यानंतर सायंकाळी रुचकर भोजनदान यासह आदी कार्यक्रमांचा आराखडा नियोजन बैठकीत मंजूर करण्यात आला.

सविस्तर वृत्त असे की नियोजन बैठकीला सुरुवात झाल्यानंतर सर्वप्रथम आराखडा काढून खर्च किती होणार याचा तपशील घेतला व त्यानंतर प्रत्येक महिलेस वर्गणी लावण्यात आली. त्यानंतर जयंती मंडळाची सर्व महिलांच्या उपस्थितीत कार्यकारणी गठित करून त्यामध्ये अध्यक्ष भारतबाई विठ्ठल निखाते, उपाध्यक्ष करुणाबाई जनार्धन गच्चे, सचिव मायाबाई भगवान गोडबोले, सहसचिव आशाबाई चांदु झिंझाडे, कोषाध्यक्ष गिरजाबाई रावण गोडबोले, सल्लागार वैजंताबाई बाबुराव गोडबोले, सहकोषाअध्यक्ष आम्रपाली सुरेश गोडबोले, सहसल्लागार वंदनाबाई रमेश गोडबोले, पदसिद्ध सदस्य अनिता अण्णाराव गच्चे, लक्ष्मीबाई श्रीरंग गच्चे, सुचित्राबाई किशन गोडबोले आणि सुनीताबाई शिवाजीराव गच्चे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने या नूतन कार्यकारणीचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी गावातील भारतीय बौद्ध महासभेचे सर्व जिल्हा तालुका आणि ग्रामशाखेचे पुरुष महिला पदाधिकारी,विश्वशांती बुद्ध विहार समितीचे पदाधिकारी, डॉ .बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती पदाधिकारी,भीम जयंती मंडळाचे सर्व पदाधिकारी, आणि समता सैनिक दलाचे सर्व पदाधिकारी यांच्यासह गावातील श्रद्धावान बुद्ध उपासक उपासिका व बालक बालिका यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# भाजपातर्फे पानगाव जिल्हा परिषद गटातून सतीश आंबेकर यांची अधिकृत उमेदवारी



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर दि. २४ – पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावातून वाडीवस्तीतून ऋषिकेशदादा कराड यांच्या नावाला पसंती होती मात्र पक्षाच्या निर्णयानुसार त्यांना उमेदवारी देणे शक्य नसल्याने भाजपाच्या वतीने सतीश आंबेकर हे अधिकृत उमेदवार असतील तेंव्हा सर्वांनी जिद्दीने जोमाने काम करून बहूमताने विजयी करावे आणि पानगाव हा लोकनेते स्व. गोपिनाथराव मुंडे साहेब यांचा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखववे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधीची बैठक भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झाली याप्रसंगी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव आनामे मामा यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आमदार आणि खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी दिली जाणार नाही असा निर्णय भाजपाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत झाला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या निर्णयामुळे पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातून ऋषिकेश कराड यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी गावागावातून वाडी वस्तीतून अनेकांनी मोठ्या प्रमाणात केली होती. पक्षाच्या निर्णयानुसार आणि आदेशान्वये ऋषिकेश कराड यांची उमेदवारी मागे घेण्यात येत असून सतीश आंबेकर यांना भाजपाचे अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केले.

आमदार खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी नाही हा पक्षाचा निर्णय रमेशआप्पा कराड यांच्या पर्यंत मर्यादित नसून राज्यातील जवळपास चाळीस जागेसाठी बंधनकारक आहे. याबाबतीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि निवडणूक प्रमुख चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्यासोबत माझी चर्चा झाली असल्याचे सांगून पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आत्तापासून जिद्दीने जोमाने कामाला लागावे आणि पुन्हा एकदा पानगाव हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध करावे असेही आ. कराड यांनी बोलून दाखवले.

लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात झालेल्या विविध विकास कामामुळे सर्वच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदार संघातून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना मोठे समर्थन मिळत असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत पानगाव जिल्हा परिषदेत भाजपाचा बहुमतानी विजय होणे गरजेचे आहे असे सांगून पानगाव पंचायत समिती निवडणूक प्रमुख म्हणून सुकेश भंडारे आणि कोष्टगाव पंचायत समितीसाठी माधव घुले आणि संपत कराड यांची नियुक्ती जाहीर केली.

या बैठकीस माजी उपसभापती अनंत चव्हाण, माजी सरपंच सुकेश भंडारे, श्रीकृष्ण जाधव, सतीश आंबेकर, अमर चव्हाण, भागवत गीते, संपत कराड, दिगंबर येडले, हरीकृष्ण गुर्ले, वैजनाथ लहाने, कुलभूषण संपत्ते, माधव घुले, सतीश कुलकर्णी, दत्तू लहाने, प्रल्हाद पोटे, शिवाजी जाधव, मारुती गालफाडे, बसवराज गुरफळे, सुंदर घुले, नाथराव गीते, राहुल मोटाडे, निवृत्ती लहाने, रमेश केंद्रे, ईलाही शेख, माणिक डोंगरे, भगवान करमुडे, विजय चिंते, प्रकाश जाधव, रफिक पठाण, शफिक पठाण, दत्ता आंबेकर, कार्तिक गंभीरे, नागेश भंडारे, पंकज लहाने, संजय केंद्रे यांच्यासह भाजपाचे अनेक पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची समाज जागृतीसाठी गरज : अ‍ॅड. रंजना पगार गवांदे

**दै. अदिती एक्सप्रेस**



लातूर – समाजात बोकाळलेली अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा आणि चालीरीतींच्या विरोधात विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अ‍ॅड. रंजना पगार गावंदे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेच्या समारोप व तिसऱ्या पुष्पाच्या प्रसंगी समाज वास्तवाला भिडताना या विषयावर विचार मांडत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते. तर विचारमंचावर सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आदीची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना अ‍ॅड. पगार गवांदे म्हणाल्या की, आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आयोगातही समाजामध्ये कर्मकांड मोठ्या प्रमाणात पसरवले जात आहेत. चेटूक, डाकिन, अघोरी उपाय करणारे भोंदू बाबा, मांत्रिक, तांत्रिक यांनी समाज नासवला आहे. तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा आणि महाराष्ट्रातील संत सुधारकांनी या सर्व वाईट चालीरीती, रूढी परंपरा यांच्या विरुद्ध परखड शब्दांत ताशेरे ओढले आहेत. अंधश्रद्धेच्या नावाखाली समाजाचे शोषण करणाऱ्या भोंदू बाबांवर गुन्हे दाखल झाले पाहिजे. स्त्रियांच्या बाबतीत स्त्री भ्रूणहत्या मुलींची कौमार्य चाचणी, चारित्र्य परीक्षा, देवदासी आणि बालविवाह प्रथा देखील विज्ञाननिष्ठ समाजाने उखडून फेकल्या पाहिजेत. जातपंचायतीमध्ये अडकलेल्या कुटुंबांना या जोखडातून मुक्त केले पाहिजे असेही त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोपात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवण्णा हे क्रांतिकारी समाज सुधारक होते त्यांच्या आंतरराष्ट्रीय कल्पना केवळ संघटित कार्याद्वारेच मूर्त होऊ शकते ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी शरण यांना एकत्र करून समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली. आजच्या लोकशाही शासन व्यवहारात देखील महात्मा बसवन्नाचे विचार तत्त्वज्ञान कार्य समाज उन्नती करिता मोलाचे आहेत असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले, पाहुण्याचा परिचय डॉ. अश्विनी रोडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले आणि आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. या व्याख्यानमालेच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. रत्नाकर बेडगे, सहसंयोजक डॉ. सिद्राम डोंगरगे, डॉ. मनोहर चपळे, डॉ. संजय गवई, प्रा. प्रमोद सराफे, प्रा. संगमेश्वर पानगावे, प्रा. व्यंकट दुडिले, डॉ. टी. घन:श्याम, प्रा. कल्पना गिराम, डॉ. अश्विनी रोडे, प्रा. जयश्री पाटील, प्रा. अनिता घवले, प्रा. किसनाथ कुडके, कार्यालया प्रमुख नामदेव बेंदर्गे, महादेव स्वामी, जलील सय्यद, श्रीकृष्ण बडगरे, शुभम बिराजदार यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला शहरातील मान्यवर, रसिक श्रोते, अभ्यासक, प्राध्यापक, शिक्षक–शिक्षकेतर, कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# ‘जागृती’ च्या ७,२१,००१ साखर पोत्यांचे पूजन



**दै. अदिती एक्सप्रेस**

वलांडी : राज्यातील खाजगी साखर कारखान दारीत नावलौकिक असलेल्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रिजच्या २०२५-२६ च्या चालू गळीत हंगामात ३ लाख ६३ हजार ४६० मे.टन ऊसाचे गाळप करुन ११.५७ उताऱ्यासह १ कोटी ६ लाख ८४ हजार ८०० युनिट विज निर्यात केली आहे.

उत्पादीत केलेल्या ७ लाख २१ हजार १ साखर पोत्याचे पूजन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा साखर काखान्याचे संस्थापक दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

यावेळी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, राम भंडारे, धनाजी कोटे, जनरल मॅनेजर गणेश येवले, मुख्य शेती अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल दरेकर, आसवणी प्रमुख विलास पाटील, फायनान्स अधिकारी ए.व्ही. सुर्यवंशी, उपमुख्य अभियंता अक्षय सुर्यवंशी, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिरादार, चिफ अकौंटंट सर्जेराव पाटील, जागृती शुगरचे विविध खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

# मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठान आणि अक्षरोदय साहित्य मंडळाचे पुरस्कार जाहीर

**दै. अदिती एक्सप्रेस**

नांदेड – मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

यावर्षी आठ व्यक्तिंची निवड झाली असून यात कादंबरीकार मोतीराम राठोड, आंबेडकरवादी विचारवंत प्रा. डॉ. आनंद इंजेगांवकर, ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते, कवयित्री प्रतिभा पांडे, पत्रकार पांडुरंग सोनकांबळे, कवयित्री सोनाली बेले, प्रा.शेख शेहनाज, गझलकार चंद्रकांत कदम यांची तर अक्षरोदय साहित्य मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांत भीमशाहीर माधवदादा वाढवे आणि ज्येष्ठ कवयित्री विमलताई शेंडे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे सचिव ग्रामीण कवी नागोराव डोंगरे, राज्यस्तरीय पुरस्कार निवड समिती प्रमुख तथा येथील साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे, अक्षरोदयचे कार्याध्यक्ष सदानंद सपकाळे यांनी आज येथे घोषणा केली. यावेळी अनुरत्न वाघमारे, माजी उपप्राचार्य प्रल्हाद हिंगोले, कैलास धुतराज, शंकर गच्चे, चंद्रकांत चव्हाण यांच्यासह प्रतिष्ठानच्या पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

अक्षरोदय साहित्य मंडळ आणि मातोश्री भागाबाई प्रतिष्ठानच्या प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, पत्रकारिता, साहित्य आदी क्षेत्रांतील महिला व पुरुष यांना पुरस्कार दिले जातात. आजपर्यंत विविध क्षेत्रातील मान्यवरांना हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते प्रतिष्ठेचे मानले जात असून यावर्षी बंजारा साहित्यरत्न पुरस्कार मोतीराम राठोड यांना, ज्ञानप्रबोधन समाज भूषण पुरस्कारासाठी प्रा. डॉ. आनंद इंजेगांवकर, उत्कृष्ट वाङ्मय भूषण पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते, मातोश्री भागाई स्मृती पुरस्कार कवयित्री प्रतिभा पांडे, क्रांतीज्योती सावित्रीबाई काव्यभूषण पुरस्कार कवयित्री सोनाली बेले, उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार पांडुरंग सोनकांबळे, फातिमा शेख स्त्रीशिक्षण गौरव पुरस्कार प्रा. शेहनाज शेख, इलाही जमादार गझलरत्न पुरस्कार सुप्रसिद्ध गझलकार चंद्रकांत कदम तर अक्षरोदयच्या वतीने कालवश स्वातंत्र्यसेनानी विठ्ठलकाका जोंधळे स्मृतीपुरस्कार क्रांतिकारी भीमशाहीर माधवदादा वाढवे यांना आणि स्मृतिशेष दीपक सपकाळे स्मृती पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री विमलताई शेंडे यांना देऊन गौरवण्यात येणार आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात विविध विषयांवर मार्गदर्शन

लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२२ जानेवारी २०२६ रोजी मौजे दावतपूर,ता.औसा येथे सुरू असलेल्या शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास या विशेष वार्षिक युवक शिबिराच्या अंतर्गत नवयुवकांच्या सक्षमीकरणासाठी ’ समृद्ध लोकशाही बळकटीकरण, व सायबर सुरक्षा आणि डिजिटल साक्षरता,आणि वाचन संस्कृती व ग्रामविकास ’ या विषयांवर मार्गदर्शनपर उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

याप्रसंगी प्रा.मेघा पंडित यांनी नवयुवक हीच राष्ट्राची खरी संपत्ती असून युवकांनी सायबर सुरक्षा व डिजिटल साक्षरतेचे ज्ञान संपादन करावे असे आवाहन केले तर डॉ.मनीषा गुरमे यांनी मोबाईल,फेसबुकच्या आभासी जगात जास्तीचे रममान न होता अभ्यासू वृत्तीने करिअर घडवावे असे सांगितले.

ग्रंथपाल प्रा.किरण भिसे यांनीही ग्रंथालयातील जास्तीत जास्त ग्रंथाचे वाचन करून वाचन संस्कृतीची जोपासना करावी असे प्रतिपादन केले. डॉ.गजानन बने व डॉ.रामशेट्टी शेटकार यांनी समृद्ध लोकशाही बळकटीकरणासाठी नवयुवकांनी पुढाकार घ्यावा.कारण नवयुवक हीच राष्ट्राची खरी संपत्ती असून ; समाज,गाव आणि राष्ट्र विकासासाठी नवयुवकांनी पुढाकार घ्यावा आणि शिबिरातील बौद्धिक ज्ञानाचा व श्रम संस्काराचा भावी वाटचालीसाठी उपयोग निश्चित करावा असेही त्यांनी सांगितले.यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल ठोसर यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे,राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,सुनील राक्षे,माधव मसलगे व ग्रामस्थ उपस्थित होते.

## दिवसा घरफोड्या करणारा मुद्देमालासह पोलिसांच्या जाळ्यात

उदगीर : उदगीर ग्रामीण पोलिसांनी दिवसा घरफोड्या करणाऱ्या एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून एक जुनी वापरातील कार व घरफोडीतील मुद्देमाल असा एकूण २ लाख ९० हजार रूपये किंमतीच्या ऐवजासह अटक केली आहे.

जगदीश जनकराव लाळे, रा. लाळी, ता. जळकोट असे त्या आरोपीचे नाव आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या नेतृत्वात उदगीर ग्रामीणचे डीबी पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांनी घरफोड्यास अटक केली आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात ग्रामस्वच्छता अभियान

**दै. अदिती एक्सप्रेस**




लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे दावतपूर, ता. औसा येथे सुरू असलेल्या शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास या विशेष वार्षिक युवक शिबिराच्या अंतर्गत आज ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानात रासेयो स्वयंसेवकांनी गावातील मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, ग्रामपंचायत परिसर तसेच पाणीपुरवठा परिसराची स्वच्छता केली. कचरा संकलन व प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात आले. यासोबतच बालवाडीच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले. स्वच्छ परिसर, स्वच्छ सवयी व आरोग्य यातील नातेसंबंध उदाहरणांद्वारे स्पष्ट करण्यात आला. या उपक्रमाद्वारे लहान वयातच स्वच्छतेबाबत सकारात्मक सवयी लागाव्यात, हा उद्देश साध्य करण्यात आला. ग्रामस्थांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रासेयो स्वयंसेवकांचे कौतुक केले. या वेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरज कोल्हे व डॉ. अमोल ठोसर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, बालवाडीचे विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ग्रामस्वच्छता अभियानामुळे गावकऱ्यांमध्ये तसेच लहान विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली.

# रासेयो शिबिरात ‘हिंद की चादर’ माहितीपटाचे सादरीकरण



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर: दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे दावतपूर, ता. औसा येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष वार्षिक युवक शिबिराच्या अंतर्गत जिल्हा परिषद शाळा, दावतपूर येथे हिंद की चादर या माहितीपटाचे विशेष सादरीकरण करण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सूचनेनुसार शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी वर्षानिमित्त या माहितीपटाचे आयोजन करण्यात आले होते. माहितीपटाच्या माध्यमातून गुरु तेगबहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवी मूल्ये व अन्यायाविरुद्ध दिलेल्या महान बलिदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता, सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करणे हा होता. माहितीपट सादरीकरणानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या जीवनकार्यावर चर्चा करून त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या माहितीपटाबद्दल उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाणीव वाढून नैतिक मूल्यांची जोपासना झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल ठोसर व डॉ.सुरज कोल्हे आणि शिक्षकवृंद तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# विश्वशांतीसाठी मैत्र भावाचा जीवनमार्ग स्वीकारायला हवा : डॉ . विश्वाधार देशमुख

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर / प्रतिनिधी– तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठावर असलेल्या जगाला विश्वशांती विश्व कल्याणासाठी मैत्र भावाचा जीवन मार्ग स्वीकारायला हवा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक तथा वक्ते डॉ विश्वाधार देशमुख यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेच्या पहिल्या विचारपुष्पात भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे या विषयावर मार्गदर्शन करत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते तर विचारपिठावर उद्घाटक शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी व्याख्यानमालेचे संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आदी विराजमान होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले.

पुढे बोलताना डॉ. विश्वाधार देशमुख म्हणाले की, जग जिंकण्याकरिता युद्धाचा मार्ग, कौर्याचा मार्ग, कायद्याचा मार्ग असे अनेक मार्ग आहेत पण करुणा, मैत्री, स्नेह, सौजन्य , सहिष्णतेचा मार्ग अत्यंत सोपा, साधा असा मार्ग आहे. यातून व्यक्ती , समाज व राष्ट्राचे जीवन अधिकाधिक समृद्ध ,सुखमय व आनंदी होईल. प्रत्येकाने काळजातला द्वेष संपवून, मी पणा विसर्जित करावा लागेल. समाजाचे नेतृत्व शिक्षकांच्या हाती दिल्यास शुद्ध चारित्र्याची माणसे तयार होऊन समाजातला मैत्रभाव आपोआप वाढेल. आई वडील, पती–पत्नी, शिक्षक विद्यार्थी, पालक पाल्य, मित्र मैत्रीण ही नाती मानवी जीवन समृद्ध करतात. श्रीकृष्ण, तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्त्वज्ञानात संत ज्ञानेश्वरांचा मैत्रभाव आपणांस दिसून येतो असेही ते म्हणाले.

आपल्या उद्घाटनपर मार्गदर्शनात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, तथागत गौतम बुद्ध महात्मा, महात्मा बसवेश्वर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतावादी धर्माचा स्वीकार करून जगाला स्नेहाचा प्रेमाचा करुणेचा संदेश दिला. व्यक्तीने चराचरातील सर्वांकडे मैत्र भावनेतून पाहिले पाहिजे. तरच जगाचा उद्धार होईल असेही ते म्हणाले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात समतेचा संदेश जगाला दिला वर्ण, जात, धर्म, वंश आणि वर्ग असा भेदभाव न करता सर्वांवर प्रेम करण्याचा संदेश दिला. देह हेच देवालय आहे , आत्मा हा परमेश्वर आहे. सदाचार म्हणजे स्वर्ग आणि अनाचार म्हणजे नरक आहे इतक्या साध्या सोप्या भाषेत काव्य कायकवे कैलास हा श्रमाच्या उपासणेचा मार्ग बसवण्णांनी सांगितला. त्यांच्या विचार तत्त्वज्ञान जीवनकार्याचा वसा वारसा पुढच्या पिढींना सांगितला गेला पाहिजे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पर मनोगत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे यांनी केले प्रमुख अतिथीचा परिचय डॉ. मनोहर चपळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके व डॉ. अश्विनी रोडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार व्यंकट दुडिले यांनी मानले.